# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :— www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.
प्रत्र क्र.रासेयो/५९८/२०१४—१५
दिनांक :— २९/०९/२०१४

प्रति,
प्राचार्य,
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सर्व महाविद्यालये,

विषय:— मतदान जनजागृती अभियान.....

मा. महोदय/महोदया,

लोकसभा निवडणूकी दरम्यान भारत निवडणुक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या सुचना प्रमाणे मुंबई विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना एककांनी मतदार नोंदणी व मतदान करण्याच्या प्रक्रीये बाबत समाधानकारक कार्य केलेले आहे. या संदर्भात भारत निर्वाचन आयोग यांचे तर्फे राष्ट्रीय सेवा योजनेच्या योगदानाची प्रशंसा करण्यात आली आहे.

मागील निवडणुकीमधील मतदाराची टक्केवारी पाहता, भारतीय लोकशाही प्रणाली मजबुत करण्यासाठी मतदारांनी मोठया प्रमाणात मतदान करणे गरजेचे आहे असे लक्षात येते. या संदर्भात निवडणुक प्रक्रियेमध्ये मतदारांनी मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक आहे या संदर्भात पथनाटये, रॅली व इतर माध्यमातुन मतदारानी निवडणुकी दरम्यान मतदान करण्याविषयी जनजागृती करणे आवश्यक आहे. या कार्यक्रमासाठी आपल्या परिसरातील रेल्वे स्थानक / बस स्थानक व इतर गर्दीच्या ठिकाणी पथनाटय व बॅनर, इत्यादी साहीत्य वापरून मतदारांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहीत करावे. मतदार जनजागृती कार्यक्रम घेत असताना संबधीत पोलीस अधिकारी व इतर आवश्यक प्राधीकरणाकडुन योग्य ती परवानगी घ्यावी.

सदर अभियान राबविताना आपल्या विभागातील निवडणूक अधिकारी यांचे सहकार्य घेण्यात यावे व त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या मतदार जनजागृतीसाठी साहित्याचा उपयोग करण्यात यावा.

उपक्रमाचा अहवाल संबधीत निवडणूक अधिकारी व विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षास सादर करण्यात यावा.

धन्यवाद !

आपला विश्वासू,

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक. रा.से.योजना

टीप: उपक्रमादरम्यान वापरण्यासाठी काही घोषवाक्य (Slogans)

- सोडुन सारे काम, चला करू मतदान
- लोकशाहीचा सुदिन आहे आज मतदानाचा दिन आहे.
- मतदान आपला हक्क आहे.
- मत आहे आमचा अधिकार, कधीही करू नका त्याला बेकार.
- आपले मतदान लोकशाहीचा प्राण
- My Vote, My Power
- Be Wise, Vote Wise
- Wasted Vote is Wasted Opportunities
- Stop Complaining and Start Voting